Special Issue, February- 2019

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Refereed Research Journal

Jr.No.41012 UGC Approved Refereed Journal

# VIDYAWARTA®



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि
जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव-ने संचलित

## लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय

दहिगाव-ने, ता.शेवगाव, जि.अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## राज्यस्तरीय मराठी चर्चासत्र

# आधुनिक मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रकार

* अतिथी संपादक *

प्रा.डॉ.निलेश खरात
प्रा.अमोल गुंड

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित

# लोकनेते मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय

दहिगाव ने ता.नेवासा, जि. अहमदनगर

आणि

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# आधुनिक मराठी साहित्य:स्वरूप आणि प्रकार

अतिथी संपादक

प्रा. डॉ. निलेश खरात

प्रा.अमोल गुंड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Index

01) आधुनिक मराठी कथा वाड्.मयाचा अभ्यास
पाटील पद्मावती प्रभाकर, सोलापूर ||08

02) आधुनिक कथालेखिका आणि त्यांच्या कथेतील समाजचित्रण
प्रा. डॉ. जितेंद्र शरणप्पा बिराजदार, जिल्हा सोलापूर ||10

03) आदिवासी मराठी आत्मचरित्रे
प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित, अहमदनगर ||13

04) आधुनिक कथा वाङ्मयाचे स्वरुप आणि मूल्ये
प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, जि. बीड ||20

05) आधुनिक स्त्रीवादी कविता
प्रा. डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ, ता.नेवासा ||23

06) आधुनिक मराठी साहित्य व ललित गद्याचा प्रवास
बिन्नीवाले उध्दव राधाकृष्ण, औरंगाबाद ||24

07) दलित साहित्य संकल्पना, स्वरुप वैशिष्टये
प्रा.दत्तात्रय सदाशिव सावंत, जि.पुणे ||26

08) फेसाटी : आधुनिक मराठी साहित्य प्रकारांच्या बदलत्या संदर्भमूल्यांचा अंतःस्वर
डॉ. बाळासाहेब दास, टेंभूर्णी ||29

09) मराठी प्रवासवर्णनातील स्त्रियांचे योगदान
डॉ. किसन रंगनाथ पिसाळ ||33

10) आत्मचरित्र : एक साहित्यप्रकार
प्रा. हनुमंत बाजीराव मते, सोलापूर ||36

11) आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे स्वरूप
प्रा. रामदास पंढरीनाथ कातकडे, जि.अहमदनगर ||39

12) साहित्य प्रकार : कथा
प्रा. डॉ. संजय दरवडे, भेंडे ||43

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

11

# आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे स्वरूप

प्रा. रामदास पंढरीनाथ कातकडे
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायंन्स कॉलेजे शेवगाव, ता. शेवगाव जि. अहमदनगर

**********

प्रस्तावना —

साहित्य निर्माण करणारे व्यक्ती ही सर्व सामान्यः पैकीच एक असते. मात्र जीवनातील अनुभव घेण्याची तिची दृष्टी आणि आपली दृष्टी यामध्ये फरक असतो म्हणूनच ती लेखक व कवी बनते. सर्व सामान्य माणूस अत्यंत व्यावहारिक दृष्टीकोनातून भोवतालचे जग पाहत असतो. त्यातूनच त्याला आवडलेले त्याने अनुभवलेले त्याच्या भावनांना कितपत व्यक्त करायचे याच्या मर्यादा आखून तो स्वत:चे लेखन करीत असतो तसेच निसर्गाकडे व समाजाकडे बघून ते जीवन ते सौंदर्य टिपण्याच्या प्रयत्न साहित्यातून सुरु असतो म्हणजे सत्य सृष्टीतून तो कल्पनाविश्व उभे करीत असतो.

साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थाचा मेळ होय. तो रसात्मक वाक्यातून घातला गेल्याने साहित्य ललित बनते. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब होय. साहित्यकार ते आपल्या निरीक्षणातून उतरवतात. साहित्य लेखनाचे मध्यम म्हणून भाषा आणि लिपीस असाधारण महत्व असते आपले पहिले 'साहित्य मौखिक होते म्हणून वाङ्मय नावाचे ते ओळखले जायचे भारतीय साहित्याचा प्रारंभ संस्कृत पासून होतो. इतिहासकारांनी भारतीय भाषा आणि साहित्याचा इतिहास लिहून ठेवला आहे.

आधुनिक मराठी साहित्य —

आज भारतीय साहित्य अनेक भाषांमधून लिहिले जात असले तरी तिचे स्वरूप मात्र एकात्म आहे, कारण त्या साहित्याचा पाया हा भारतीय संस्कृती आहे, भारताच्या संदर्भात रवींद्रनाथ टागोर यांनी विश्वभारती तर महाराष्ट्रात साने गुरुजींनी अंतरभारती संकल्पना साधना, साप्ताहिकातून स्पष्ट केली होती. भारतीय साहित्यात प्राचीन काळापासून मिथक, चिंतन, मुल्य अश्या त्रिविध अंगांनी समान परंतु समांतर अभिव्यक्ती होत आली आहे, त्यातूनच राष्ट्रीय तेचा विचार पुढे आला आहे.

आधुनिक मराठी साहित्याचा समकालीन, सामाजिक, स्थितीगतीशी अंतस्थ आणि खोलवरचा संबंध आहे. त्यामुळेच आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता यांचे अंतरसबंध व अंतरक्रिया सुविहितपणे निरखून तपासूनच या साहित्याचे आस्वादन व मुल्यांकन होऊ शकते. साहित्याचा सामाजिक अनुबंध लक्षात घेतल्याने ज्या मराठी समाजात अन संस्कृतीत हे साहित्य निर्माण होत आहे. त्यावरही प्रकाश पडतो स्वातंर्त्यत्तर काळाच्या खुल्या वातावरणात उद्‌भवलेल्या सामाजिक चाळवळी. आणि त्यांचा साहित्य निर्मितीवर पडलेला प्रभाव या मुळे साहित्याकडे आत्ता केवळ कलात्मक निर्मिती म्हणून न पाहता 'एक सामाजिक सांस्कृतिक घटना' म्हणून पाहणे भाग आहे.

इ.स. १८२० ते १८७० पर्यंतचा पन्नास वर्षाचा मराठी वाङ्मयाचा काळ हा आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पूर्व तयारीचा काळ होय. इ.स. १८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त होत गेली. असे आपण मानतो. विष्णू शास्त्री चिपळूणकरांच निबंध मालेतील निबंध, हरिभाऊ आपटे यांची कथा—कादंबरी, केशव सुतांची कविता, किर्लोस्काराची नाटके हे मराठी साहित्याच्या आधुनिकतेचे पहिले उन्मेष मानले जातात. आधुनिकता मराठी साहित्यात १८७५ नंतरच्या पंचवीस —तीस वर्षात नीटपणे प्रस्थापित झाली. हिची अनेक वैशिष्टे आहेत. त्यातील आधुनिकतेचे प्रमुख अशय वैशिष्टे म्हणजे सामाजिक वर्तमान वास्तवाच्या आणि भौतिक जीवनाच्या प्रखर जाणीवेचा वाङ्मयातील अविष्कार होय. या सामाजिक वास्वावाची व्याप्ती किती होती ? कोणत्या मराठी समाजाची संवेदना या मराठी साहित्यात प्रतिबिंबित होत होती. असे आणि यासारखे अनेक प्रश्न त्या वेळच्या मराठी साहित्याच्या

संदर्भात उपस्थित होतात. त्यांचे थोडक्यात उत्तर असे मिळते की, या काळात आणि नंतरही पुढे १९२० पर्यंत आधुनिक मराठी साहित्य समृद्ध आणि विविधतापूर्ण झाले असले तरी मराठी समाजातील मुठभर उच्चवर्णीयच त्याची निर्मिती करीत होते. साहित्यिक कोणत्याही वर्गाचा ,जातीचा वा वर्णाचा असला तरी तो प्रतिभावंत असल्यामुळे त्याची वाङ्मयीन जाणीवही त्यांच्या सर्व समाजाला मानसिकदृष्ट्या व्यापून राहणे आवश्यक असते. तरच त्याचे साहित्य त्या समाजाचे प्रतिनिधित्व करू शकते. असे असले तरी मुठभरांच्या संकुचित जाणिवांच्या साहित्याला सर्व आधुनिक मराठी समाजाच्या साहित्याचे प्रतिनिधित्व दिले जात होते. आणि त्या अर्थाने त्याला मराठी साहित्य ही संज्ञा वापरली जात होती.

**आधुनिक मराठी साहित्य कादंबरी –**

गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही पुरातन मानवी प्रवृत्ती आहे, म्हणूनच इंग्रजी राजवटीत जन्माला आलेला 'कादंबरी' हा प्रकार स्वीकारला गेला, १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथात कादंबरीचा अर्थ एक कल्पित कथा असा दिला आहे. तेव्हापासून आजतागायत कादंबरीच्या स्वरुपात असंख्य बदल घडून आलेले दिसतात. कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर चालणारा—वाढणारा—बदलत जाणारा असा साहित्य प्रकार आहे. घटना, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषा इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते. कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा साहित्य प्रकार आहे. जीवन व्यवहाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. कादंबरी हा वाङ्मय प्रकारच असा आहे की, ज्याचा अनेक अंगांनी अभ्यास करता येतो, मात्र नेमक्या दिशेने प्रवास केल्यास तिचे मर्म अचूकपणे आपल्या हाती लागेल याचा नि:संदिग्ध उलगडा म्हणावा तशा प्रकारे झाला नाही. कारण आकलनाच्या संदर्भात अभ्यासकांना आव्हान देण्याचे फार मोठे सामर्थ्य या वाङ्मय प्रकारात दडलेले आहे. वाङ्मयीन क्षेत्रामध्ये एका विशिष्ट स्वरूपाच्या वाङ्मय प्रकारचा निर्देश करण्यासाठी 'कादंबरी' ही संज्ञा मराठी समीक्षेमध्ये रूढ झालेली आहे.

कादंबरीतील कथानक हे कुठल्यातरी वातावरणात घडते. हे वातावरण अभ्यासात्मक असते. कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतर पणे चालणारा वाङ्मय प्रकार असल्यामुळे स्वाभाविकच त्याचा आवाका मोठा आहे. कादंबरी हा मानवी जीवन व्यवहाराचे रूप प्रतिबिंबत करणारे एक आरसा आहे. कादंबरी हाच एक वाङ्मय असा आहे. की ज्याच्यामध्ये व्यक्तीला असणाऱ्या अनेकविध पपरिणामांचा साकल्याने उपयोग करता येतो. कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्मक साहित्य प्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत अनेक आशय सूत्रे असतात. कादंबरीत भाषा प्राय: साधनरूप असते पण प्रसंगी तिला मध्यमरूप ही व्हावे लागते. कादंबरीला वास्तवात प्राप्त होण्यासाठी पात्रांना जिवंतपणा प्राप्त करून देण्यासाठी विशिष्ट स्थलकाल उभारावे लागते. यालाच आपण वातावरण असे म्हणतो. कादंबरी या वाङ्मय प्रकारचा उद्याच मुळात एक सामाजिक जाणीवेतून झाला आहे.

**कादंबरीचे स्वरूप –**

साधारणत: अधिक लांबीच्या काल्पनिक कथा असलेल्या गद्य लेखनास कादंबरी असे म्हणतात. मराठी भाषेतील कादंबर्यांनी मराठी साहित्याचा ठेवा समश्द्ध केला आहे. कादंबरी हा शब्द भारतात सातव्या शतकात होऊन गेलेला बानभट्ट नामक कवीने लिहिलेले 'कादंबरी' या ग्रंथनावरून आला आहे. ग्रंथ म्हणजे जगातील पहिली कादंबरी होय. इंग्रजीतील The Tales Of Genii ही पहिली कादंबरी ११ व्या शतकात लिहिली गेली.

कादंबरी या साहित्य प्रकराला अभ्यासतांना त्यासाठी असणाऱ्या करार,काळ, आवाज या संकल्पनानाही लक्षात घ्याव्या लागतात. डॉ. मिलिंद' मालेशी यांनी दिलेल्या साहित्याचा पायाभूत करार या संकल्पनेनुसार 'कथन करणे' हा कादंबरीचा करार सांगितला जातो. म्हणजेच कथनात्मक या साहित्याच्या मुलभूत प्रवृत्तीत कादंबरी हा प्रकार मोडतो. यातून कादंबरीकार त्याने अनुभवलेल्या जीवनाचे त्रयस्थनपणे कथन करत असतो. म्हणून या प्रकाराला आत्मनिष्ठा म्हणता येत नाही कादंबरीत येणाऱ्या या जीवनपट

एका विशिष्ट काळाचे दर्शन घडवत असतो. कादंबरी ही कथनात्मक स्वरुपाची असल्याने कादंबरीकार त्यातील व्यक्तिरेखांविषयी सांगत असतो म्हणजे ती म्हणजे टी. रास इलियट च्या आवाजाच्या कल्पनेनुसार कादंबरीचा दुसरा आवाज असतो.

१) कथानकविचार —

आधुनिक मराठी कादंबरी विविध प्रकारच्या मंत्रातंत्राची माताब्बरी सोसत असते. तसेच मंत्रातांत्राचे जोखड झुगारून मोकळी झालेली आहे. वास्तववादाचा पुरस्कार करून ती सामाजिक बनलेली दिसते तर विशिष्ट हेतूंनी इतिहास कालीन पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक संज्ञाप्रवाहात्मक विज्ञान विषयक असे अवतार धारण केलेले दिसतात या सर्वांचा कथानकाशी घनदाट संबंध असतो. कथानक हा कादंबरीचा एक महत्वाचा घटक आहे. कथानकात घटना पात्रे यांचा समावेश असतो. घटना व पात्रे यांच्या परस्पर संबंधातून क्रिया घडतात त्यामुळे कथानक साकार होऊ लागते घटना हा कादंबरीतील लहानातला लहान घटक असतो. घटनेला हेतू जीवनदृष्टी मुल्याभाव यांची आवरणे असतात. कथानकात उत्कंठा, हुरहूर, विस्मय, कलाटणी वगैरे तंत्राचा अवलंब केलेला असतो. कथानकात उपकथानके मूळ कथानकाला प्रभावशाली करण्यासाठी येत असतात. कथानक ही व्यापक गोष्ट आहे म्हणून कथानकात कादंबरीतील पात्रे, प्रस्तुतीकरणपद्धती, वातावरण, दृष्टीकोन, भाषा या सर्वच घटकांचा समावेश होतो.

२) पात्रविचार —

कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रेच करीत असतात एखाद्या कादंबरीत किती पात्रे असावित, याला ठराविक नियम नाही. कादंबरी हा साहित्यप्रकार समाजजीवनावरोबर वाढत राहणारा असल्यामुळे समाज ? जीवनातले व्यवहार माणसामाणसातील परस्पर संबंध, राग, लोभ, हर्ष, खेड या भावना यांच्या केंद्रस्थानी 'माणूसच' असतो कादंबरीत येणाऱ्या पात्रांचे मुख्यत: मुख्य पात्रे व गौण पात्रे असे वर्गीकरण केले जाते. मुख्य पात्रात नायक, नायिका, खलनायक प्रतिनायक याचा समावेश होतो, तर गौण पात्रात इतर सर्साधारण पात्रांचा समावेश होतो. कादंबरीतील पात्रे जशी मानवी असतात. तशी अमानवी देखील असतात एखाद्या वैज्ञानिक कादंबरीत एखादे यंत्र पात्र असते निसर्ग देखिल पात्र रूप होऊन अवतरतो

वि स खांडेकरांची कादंबरी पुराणकाळातील यायातिच्या जीवनावरची 'कोसला' आजच्या एक तरुणाच्या जीवनाची दोन्ही स्वत:ची कहाणी स्वत: सांगत आहेत एखादे पात्र जेव्हा स्वत: स्वत:ची कहाणी सांगतो म्हणजे नियोदित करते त्याला निवेदक असे म्हणतात ययाती दुखी कष्टी होऊन सांगत आहे. सांगवीकर सांगण्यासारखं काहीच नाही असा गमतीचा सूर लाऊन सांगत आहे. या त्यांच्या पद्धतीमुळे त्यांच्या व्यक्तिमत्वे जाणून घेण्याचे कुतूहल निर्माण होते.

३) वातावरण —

कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतर चालणारा व वाढणारा वाङ्मय प्रकार आहे. कादंबरीकार घटना प्रसंग व्यक्ती यांच्याद्वारा जे कथानक निर्माण करतो त्या कथनकाला वास्तवता, अस्सलपणा, प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. मानवी जीवनाचा जगण्याचा संदर्भ हा फार व्यापक असतो. कलावंत तेवढ्या व्यापक संदर्भात ही गुणवत्ता उकलू पाहतो . त्यासाठी तो स्थालकालाच्या कक्षा ओलांडून मानसिकतेत ही प्रवेश करीत असतो व या सर्वांच्याद्वारा वातावरणाची निर्मिती करीत असतो. स्थलकाल परिस्थितीशी संबंधित वातावरणाचे वर्गीकरण ही करता येते. भौगोलिक, पौराणिक ऐतिहासिक, सामजिक, मानसिक इत्यादी लेखकांच्या जीवनविषयक दृष्टीकोनाची चिंतन हाही वातावरणाचा भाग म्हणून येत असतो, वातवरणामुळे कादंबरीला संदर्भ प्राप्त होऊन एक व्यापक अलोक किवा परीपेक्ष्य प्राप्त होतो. व त्या व्यापक फलकावर जीवनविषयक कित्येक गुढे उकलण्यास कादंबरी काराला शक्य होते.

४) लेखकाचा दृष्टीकोन —

लेखकाचा दृष्टीकोन हा कादंबरीच्या कालात्मक्तेशी अधिक निगडीत असतो लेखक आपल्या दृष्टी कोनानुसार त्याचा अंत:स्थ हेतूंचा, मुल्यांचा, कलात्मकतेचा अविष्कार करण्यासाठी कादंबरीची रचना करून त्यात वातावरण पात्रे भाषा इत्यादी घटकांना संयोजित करीत असतो. कुठल्याही साहित्यकृती ही

वाचकाशी प्रत्यक्ष संवाद साधित असतो. या संवादाच्या माध्यमातून ती वाचकाला जीवन विषयक जाणीव करून देत असते. कादंबरीत व्यक्ती जीवनाशी व पर्यायाने समाजजीवनाशी निगडीत भरपूर अनुभव असतात. लेखक ते अनुभव स्वत: घेऊन त्यांना अधिकधिक उघड्यावाघड्या स्वरुपात मांडणीसाठी धडपडत असतो. कुठल्याही साहित्य कृतीला दृष्टिकोनामुळेच अर्थपूर्णत: येते कारण दृष्टीकोन हे मोठे ज्ञानमुल्ये आहे.

**५) निवेदनपद्धती विचार —**

कादंबरी हा निवेदन प्रधान वाङ्मय प्रकार आहे. कादंबरीला कथानक असते. हे कथानक निवेदन या प्रस्तुतीकारण पद्धतीच्या द्वारे सांगावे लागते. कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्मक साहित्य प्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत अनेक आशय व सूत्रे असतात. कादंबरीतल्या अशयाला नेमके पेलण्यासाठी प्रस्तुतीकरणाच्या अनेक पद्धती वापराव्या लागतात. निवेदक वर्णन संभाषण, स्वभाषण—भाष्य हे एकमेकांच्या हातात हात घालुन किवा एकमेकांच्या पोटात दडूनदेखील येत असतात. कादंबरीतल्या या सर्व पद्धतीचा गरजे नुसार वापर करून घ्यावाच लागतो.

**६) भाषाविचार —**

कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर वाहात वाढत विकसित होत जाणारा वाङ्मय प्रकार आहे. जीवनातील अनेक घटना माणसामाणसांतील विविध प्रकारचे संबंध, एकाच व्यक्तीच्या मनातील विचारांची गुंतागुंत हि कादंबरीच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे व्यक्त होऊ शकते. यासाठी भाषा ही अशा सूत्राला अनुसरून वापरली जाते. घटना प्रसंगाची वर्णने मानवी मनातील भावनांची स्पंदने स्थळप्रदेशांची वर्णने ही भाषेद्वारेच केली जाते. संवाद हेच भाषेचे मुख्य कार्य आहे. कादंबरीतील वातावरण विविधरंगी करायला प्रामुख्याने भाषाच मदत करते. निरनिराळ्या पात्रांची निराळी भाषा प्रसंगाला अनुरूप भाषा वापरून कादंबरीकार कादंबरीला जिवंतपणा आणून सत्यभास निर्माण करीत असतो.

**निष्कर्ष —**

१) मराठी भाषेत लिहिलेली कादंबरी ही एक विशिष्ट अशा मराठी भाषिक संस्कृतीचा भाग आहे. आणि वाचकाच्या अभिरुचीचा संबंध ही याचा भाषिक संस्कृतीशी आहे.

२) कादंबरीतील वातावरण विविध रंगी भाषा करायला भाषाच मदत करते.

३) कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्म साहित्य प्रकार आहे.

४) कादंबरी व्यक्तीजीवनाशी व पर्यायाने समाज जीवनाशी निगडीत भरपूर अनुभव असतात.

५) कादंबरीच्या स्वरूपाचा विचार करतांना हा एक समग्रलक्षी लवचिक संथ आणि अत्यंत मुक्त असा वाङ्मय प्रकार आहे.

६) कादंबरी हा वास्तवभिमुख वाङ्मय प्रकार असल्यामुळे या वातावरणाचा अभास अधिक गडद पणे यावा या साठी कादंबरीतील पात्रे ज्या प्रदेशावर सक्रीय असतात, त्याचा स्पष्ट ठसा वाचकाच्या मनावर उमठाव असा प्रयत्न कादंबरीकार करीत असतो

७) कादंबरी हा जीवन प्रवाहाशी सामंतर चालणारा व वाढणारा वाङ्मय प्रकार आहे.

८) कादंबरी हा मुलत: सामाजिक द्रव्य घेऊन निर्माण होणारा साहित्य प्रकार आहे.

९) कादंबरी हा मानवी जीवनव्यवहाराचे रूप प्रतिबिंबित करणारा एक आरसा आहे.

१०) मुख्यत: ज्या कादंबरीचे स्वरूप घटनाप्रदान असते त्या कादंबरीमध्ये कार्यकरणभावात्मक सूत्राची आपल्याला अधिक तीव्रतेने जाणीव होते.

**संदर्भ ग्रंथ —**

१) भारतीय भाषा व साहित्य — डॉ.सुनीलकुमार लवटे

२) आधुनिक मराठी साहित्य सामाजिकता — डॉ.मृणालिनी शहा — डॉ.विद्यागौरी टिळक

३) कादंबरी स्वरूप व समीक्षा — डॉ.द.भि. कुलकर्णी

४) साहित्यदर्शन पेपर क्र ३ — डॉ.दि.भी. गायकवाड

५) आधुनिक साहित्य स्वरूप आणि समीक्षा — प्रा.डॉ.म.सु.पगारे